**Limca**
Book of Records
*National Records*
Edu. on Wheels, an initiative of Sachin V. Joshi Caters to educational Needs of slum Children.

*Editor, Limca Book of Records*

ज्ञानाचा प्रकाश
झोपडपट्टीत नेशी
धन्य धन्य होशी
सचिन तू.
मंगेश पाडगांवकर
८.३.२००८

## सचिन विलास जोशी
**शिक्षणतज्ञ**

भारतीय समाजव्यवस्थेत आज आपण व्यक्तिच्या सर्वांगीण विकासाचा पाया म्हणून शिक्षणाकडे बघत असतो, म्हणूनच डॉ. ए. पी.जे अब्दल कलाम म्हणतात कि, आपल्या भारताची प्रगती करावयाची असेल तर तीन व्यक्तिंवर अधिक मेहनत ह्या.. १) विद्यार्थी २) पालक ३) शिक्षक, हेच उद्याचा भारत घडविणारे मुलभूत घटक आहेत. याच गोष्टीला नजरेसमोर ठेवून व याच ध्येयाने प्रेरित होवून सचिन वि. जोशी यांनी शिक्षण क्षेत्रात कार्य करण्यास सुरुवात केली.

अतिशय कमी वयात त्यांनी शिक्षण क्षेत्रात अद्वितीय कार्य केले. विविध नविन संकल्पना त्यांनी शिक्षणक्षेत्रात रुजविल्यात. जिथे शिक्षण पोहचू शकत नाही तिथे शिक्षण पोहचविण्यासाठी त्यांनी समाजकार्याच्या माध्यमातून भारतातील पहिली 'फिरत्या शाळेची' संकल्पना तयार केली व तळागाळातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचविले तसेच प्रयोगशील शाळा, गांधी-मॉन्टेसरी प्रेरीत शैक्षणिक तत्वांवरील शाळा व बालमानसशास्त्र आधारीत शाळांवर ते कार्य करतात. या सर्वांची दखल लिम्का बुक ने घेवून, 'एज्युकेशन ऑन व्हिल' ची नोंद मध्ये लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आणि महाराष्ट्रातील युवा शिक्षणतज्ञ म्हणून सुध्दा त्यांना गौरविले .

### सचिन जोशी यांच्या कार्याचा आढावा खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी विश्वस्त,संचालक | : | यंग एज्युकेशन सोसायटी |
| संस्थापक, संचालक | : | इस्पॅलियर एक्सपेरिमेंटल स्कूल. (गांधी मॉन्टेसरी प्रेरीत शैक्षणिक तत्वावर आधारीत शाळा) |
| संकल्पक,जनक,संचालक | : | 'चाकं शिक्षणाची' सामाजिक शैक्षणिक संस्था,नाशिक (झोपडपट्टीतील वंचित विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या दारी मोफत शिक्षण देणारी / साक्षर करणारी भारतातील अद्यावत फिरती शाळा.) |
| संस्थापक, संचालक | : | किड्सविझ टॉय लायब्ररी (शैक्षणिक खेळण्यांची लायब्ररी) |
| संस्थापक, संचालक | : | झेनिथ ट्रेनिंग मॅनेजमेंट कन्सलटंट प्रा.लि. |
| विद्यार्थी प्रशिक्षक | : | विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संपुर्ण महाराष्ट्रभर विविध कार्यशाळा, परिसंवाद, मार्गदर्शनपर व्याख्यान, याच माध्यामातून आत्तापर्यंत ५ लाखाहून अधिक शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण |

| | | |
|---|---|---|
| पालक प्रशिक्षक | : | पालकांसाठी 'माता कार्यशाळा', 'बाबांची कार्यशाळा', 'जबाबदार आई बाबांसाठी' या बालमानसशास्त्र या विषयावर महाराष्ट्रभर व्याख्याने व या माध्यमातून २.५ लाखाहून अधिक पालकांना समुपदेशनपर व्याख्यान |
| शिक्षक प्रशिक्षक | : | शिक्षकांसाठी बालमानसशास्त्राचा विचार करून 'शिकविण्याची कला' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्याने. या माध्यमातून आत्तापर्यंत ४० विविध शाळांमध्ये ते स्कुल कन्सलटन्सी देतात. |
| संचालक | : | ग्रीन इंडिया हॉबी होम ॲक्टीव्हीटी सेंटर |

**-संकल्पना, लेखन -**

1) 'मैत्री अभ्यासाशी' या प्रचंड खपाच्या पुस्तकाचे लेखक.
आत्तापर्यंत ९ आवृत्ती व २ लाखांहून अधिक प्रतिंची विक्री

2) 'Friendship with Study" मैत्री अभ्यासाशी या पुस्तकाचे इंग्रजीमध्ये अनुवाद.

3) अ... अभ्यासाचा या पुस्तकाचे लेखक.

4) 'विद्यार्थी अभ्यास नियोजन शालेय दिनदर्शिका'
महाराष्ट्रातील प्रथम विद्यार्थ्यांसाठी शालेय व परिक्षेच्या अभ्यासाचे नियोजन बनविणारी दिनदर्शिका निर्मिती.

5) 'हसत खेळत मैत्री अभ्यासाशी' - ध्वनिफित
महाराष्ट्रामध्ये प्रथमच शिक्षणक्षेत्राच्या इतिहासामध्ये अभ्यास व परिक्षेवरील ध्यासाची प्रेरणादायी गाणी व समुपदेशन ध्वनिफित.

6) सृजनदर्शिका (कला दिनदर्शिका)
लहान मुलांच्या कलेला संधी व कौतुक होण्यासाठी कलात्मक सृजनदर्शिकेची लेखन निर्मिती.

7) लोकमत, सकाळ, टाईम्स अशा वृत्तपत्र व विविध नियतकालिकां मध्ये विद्यार्थी व पालकांच्या विकासासाठी नियमित मार्गदर्शनपर लेख.

या सर्व कार्याची दखल घेवून सचिन सरांना विविध मान्यवरांकडून आशिर्वाद, प्रोत्साहन व पुरस्कार प्राप्त झाले आहे, यामध्ये राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील , मंगेश पाडगांवकर, राम शेवाळकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, सुंदरलाल बहुगुणा, प्रविण दवणे, आण्णा हजारे, हेगडे सर, राष्ट्रपती पुरस्कार विजेते बि.जे. शेखर, रा.ग. जाधव, पु.ग. वैद्य, सुधीर मोघे, भिष्मराज बाम, विजय दर्डा सर, विविध वृत्तपत्र संपादक, विविध आय.ए.एस. ऑफिसर, विविध राजकिय मान्यवर यांनी सचिन जोशींच्या कार्याला गौरविलेले आहे. तसेच विविध न्युज चॅनल वर्तमानपत्र, रेडिया; यांवर त्यांच्या प्रकट मुलाखती नियमित येत असतात.

श्री. सचिन जोशी:
आशीर्वाद.
शिक्षणाने नाक
ज्याने वाकविले
त्याने वाकविले
अज्ञानाला.

८.३.२००८
नाशिक